सन २०१८ - २०१९ | दि. १/४/२०१८ ते ३१/३/२०१९ | लेखापरीक्षण वर्ग "अ"



# ४१ वा वार्षिक अहवाल




## ठाणे जिल्हा विद्यासेवक सहकारी पतपेढी, लि., ठाणे-पालघर.


नोंदणी क्र. : टी.एन.ए./बी.एन.के./४०३ दि. १२/४/१९७९



मुख्य कार्यालय : सुंदरा प्लाझा, पहिला मजला, सनई मंगल कार्यालय इमारत, बैल बाजार, कल्याण (प), जि. ठाणे - ४२१ ३०१.

# ठाणे जिल्हा विद्यासेवक सहकारी पतपेढी लि., ठाणे-पालघर.

आमचे प्रेरणास्थान



माजी आमदार श्री. रामनाथ मोते
सल्लागार



माजी आमदार स्व. श्री. वसंतराव बापट
संस्थापक



मान. श्री. जयंतराव ओक
सल्लागार



श्री. सुधीर घागस
अध्यक्ष



सौ. प्राजक्ता लोटलीकर
उपाध्यक्षा



प्रा. रमेश बुटेरे
कार्यवाह



श्री. देविदास नरवाडे
कोषाध्यक्ष



श्री. राजाराम पाटील
तज्ञ संचालक



श्री. शेख रेहान अ. रहेमान
संचालक



श्री. मनोहर इसामे
संचालक



श्री. गुलाबराव पाटील
संचालक



श्री. प्रशांत भामरे
संचालक



श्री. सतिश कोल्हे
संचालक



श्री. कमलाकर जागरे
संचालक



श्री. संदिप कालेकर
संचालक



श्री. दुर्जन भोईर
संचालक



श्री. नाना वाडीले
संचालक



कु. जया मुलचंदानी
संचालिका



सौ. मंगला राठोड
संचालिका



श्री. चंद्रकांत बिरारी
सल्लागार



श्री. चंद्रशेखर बागुल
कार्यलक्षी संचालक तथा व्यवस्थापक



श्री. अनिरुध्द गाडगीळ
उपव्यवस्थापक



**माजी आमदार श्री. रामनाथ मोते**
सल्लागार

।। नातं विश्वासाचं - स्वप्न विकासाचं ।।

# ठाणे जिल्हा विद्यासेवक सहकारी पतपेढी लि.,

## ठाणे-पालघर

# मनोगत

आदरणीय सदस्य बंधु-भगिनी,

सप्रेम नमस्कार,

ठाणे जिल्हा विद्यासेवक सहकारी पतपेढी या पतपेढीतील सर्व घटकांना संचालक मंडळाकडून "विद्यासेवक परिवार" म्हणून संबोधित केले जाते. मला अभिमान या गोष्टीचा वाटतो की, केवळ "परिवार" म्हणून संबोधित न करता संचालक, शिक्षक-शिक्षकेतर सदस्य, पतपेढीतील कर्मचारी हे खरोखरच एका परिवाराप्रमाणे परस्परांशी सहकार्य भावनेने वागताना दिसतात.

पतपेढीने देदिप्यमान ४ दशके पूर्ण केली आहेत. दरवर्षी प्रगतीचा आलेख उंचावत आहे. ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, नफा वाटणी, विविध योजनांद्वारे सभासदांना दिलेले लाभ, कर्जावरील व्याजदर कमी करुनही लाभांश स्थिर ठेवणे, ठेवींवरील व्याज वाढवणे या सर्व बाबी "नातं विश्वासाचं, स्वप्न विकासाचं" या ब्रिदवाक्याच्या सत्यतेची साक्ष देतात.

केवळ आर्थिक लाभ देऊन न थांबता दरवर्षी "आरोग्य संदेश दिन" साजरा करुन सभासदांचे आरोग्य वृध्दींगत करण्याचे कामही प्रभावीपणे संचालक मंडळ करीत आहे.

केवळ नफा वाढीच्या मागे न धावता सभासदांना प्रत्यक्ष आर्थिक लाभ कसा देता येईल हे संचालक मंडळाने आजवर घेतलेल्या निर्णयातून व योजनांतून दिसून येते.

पतपेढीचे मुख्यालय खरेदी केल्यापासून आर्थिक बचतीच्या ध्येयापोटी दुरुस्त केले नव्हते. स्पर्धेत पुढे राहण्यासाठी कार्पोरेट कार्यालयही काळाची गरज झाली आहे. त्या उद्देशाने मुख्यालयाच्या नुतनीकरणाचे काम हाती घेतले आहे. विद्यासेवक या नात्याने सभासदाची कन्या ती विद्यासेवकची कन्या या कन्येसाठी व लेक वाचवा, लेक शिकवा हा संदेश सभासदांपर्यंत पोहचवण्यासाठी "विद्यासेवक कन्यादान योजना" सुरु केली आहे. या योजनेद्वारे सभासदाच्या एका कन्येस विवाह प्रित्यर्थ रु. ५,५५५/- चा धनादेश देऊन 'कन्यादान' मध्ये सहभाग नोंदवला जातो. संगणकीकरणाचे कामही पूर्ण झालेलेच आहे.

आपणा सर्वांचे प्रेम, सहकार्य व विश्वास आहेच, वृध्दींगत व्हावा ही प्रार्थना !

गुणवंत पाल्य व सभासद तसेच सेवानिवृत्त सभासदांचे अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा !

नवीन शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा !

धन्यवाद !

आपला,

**रामनाथ मोते**

**माजी आमदार तथा सल्लागार**

ठाणे जिल्हा विद्यासेवक सहकारी पतपेढी लि.

।। नातं विश्वासाचं - स्वप्न विकासाचं ।।

# ठाणे जिल्हा विद्यासेवक सहकारी पतपेढी लि.,

## ठाणे-पालघर



श्री. सुधीर देवराम घागस
अध्यक्ष

# अध्यक्ष मनोगत

आदरणीय सभासद बंधु-भगिनी,

मनःपूर्वक नमस्कार,

विद्यासेवक पतपेढीचा ४१वा वार्षिक अहवाल आपल्या हाती देताना मनापासून आनंद होत आहे.

"नातं विश्वासाचं, स्वप्न विकासाचं" या आपल्या घोषवाक्याप्रमाणेच विद्यासेवक पतपेढीची वाटचाल सुरु आहे याची प्रचिती या अहवालाच्या अवलोकनानंतर येईल असा ठाम विश्वास आहे. सन्मा. सदस्यांनी ज्या विश्वासाने पतसंस्थेची धुरा संचालक मंडळाकडे सोपवली आहे तो विश्वास सर्वार्थाने सार्थ ठरवत सभासदांच्या विकासाचं ध्येय संचालक मंडळ साध्य करीत असल्याचे समाधान आहे.

विद्यासेवक पतपेढीचे वैशिष्टपूर्ण स्थान आहे. त्याचे कारण म्हणजे मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी ज्या उद्देशाने पुजनीय बापट सरांनी ही पतसंस्था स्थापन केली व ते ज्या निष्ठेने आदरणीय ओक सर व आदरणीय मोते सर यांनी जोपासले त्याचे हे फलित आहे. याच द्वयींच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळ केवळ आणि केवळ सभासद हित डोळ्यासमोर ठेऊन कार्य करीत आहे.

केवळ नफा वाढीच्या मागे न लागता नफावाढीबरोबरच अनेक मार्गांनी सभासदांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असतो. १) स्व. वसंतराव बापट कर्ज संरक्षण योजनेद्वारे रु. ३ लाखाचे आर्टिकल कर्ज संरक्षित केले जाते. २) कर्ज रकमेच्या केवळ २ टक्के रक्कम ठेव म्हणून स्विकारुन रु. १५ लाखापर्यंतचे साधारण कर्ज सभासदाचे जिवीतास काही झाल्यास माफ केले जाते. ३) कोणत्याही प्रकारची प्रोसेसिंग फी न घेता अथवा तारण न ठेवता रु. १५ लाखापर्यंतचे साधारण कर्ज रु. ३ लाखापर्यंतचे आर्टिकल कर्ज सहजरित्या दिले जाते. कर्ज मर्यादा वाढविण्याचाही मानस आहे. ४) लेक वाचवा लेक शिकवा हा संदेश दृढ करण्यासाठी सभासदाची मुलगी ही विद्यासेवक परिवारातीलच मुलगी आहे, तिच्या विवाहाप्रित्यर्थ रु. ५,५५५/- रकमेचा धनादेश सभासदाच्या एका मुलीला देऊन तिचे कन्यादान "विद्यासेवक कन्यादान" योजनेद्वारे केले जाते. या योजनेस आपण मान्यता द्यावी असे नम्र आवाहन आपणास करीत आहे. ५) कर्ज मर्यादा वाढवली मात्र कर्जावरील व्याजदर कमी केले तरीही लाभांशाचा दर कायम ठेवला आहे. ६) दरवर्षी पतपेढी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांचा शारिरीक, बौध्दिक व संस्कारिक विकास साधून सभासदांना दर्जेदार सेवा दिली जाते. ७) पतपेढीचे सल्लागार आदरणीय श्री. रामनाथ मोते सर यांचा जन्मदिन दरवर्षी सभासदांच्या आरोग्यवर्धनासाठी आरोग्य संदेश दिन म्हणून साजरा केला जातो.

मागील वर्षापासून पतपेढीने आपली वेबसाईट सुरु केली आहे. आपण thanevidyasevakpatpedhi.com या साईटवर माहिती जाणून घेऊ शकता. दरवर्षी गुणगौरव कार्यक्रमाद्वारे सभासदांचे गुणवंत पाल्य व गुणवंत सभासद यांना भेटवस्तू देऊन त्यांना प्रोत्साहन देत असतो. सेवानिवृत्त सभासदांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मागील वर्षापासून स्वतंत्र "कृतज्ञता सोहळा" आयोजित केला जातो.

आम्हाला शासन दरबारी वेळोवेळी सहकार्य करणारे आदरणीय आमदार ॲड. निरंजन डावखरे साहेब, सभासद कल्याणाकारीता तळमळीने काम करणारे संचालक मंडळ, पतपेढीचे कर्तव्यदक्ष अधिकारी व कर्मचारी मित्र, विश्वासाने पतपेढी आमच्या हाती देऊन सहकार्य करणारे आपण सर्व सन्माननीय सभासद बंधू-भगिनी, शाळांचे मुख्याध्यापक व लिपीक वर्ग, सहकार क्षेत्रातील आम्हाला सहकार्य करणारे अधिकारी, पतपेढीला पुरस्कार देऊन गौरविणाऱ्या विविध संस्था, सन्मा. ठेवीदार व हितचिंतक तसेच सहकार्य करणारे ज्ञात अज्ञातांचे मनःपूर्वक आभार. भविष्यातही असेच सहकार्य लाभेल ही अपेक्षा.

सभासदांचे यशवंत पाल्य, गुणवंत सभासद यांचे अभिनंदन व सेवानिवृत्त सभासदांना हार्दिक शुभेच्छा !

धन्यवाद !

आपला,

सुधीर देवराम घागस

अध्यक्ष

ठाणे जिल्हा विद्यासेवक सहकारी पतपेढी लि.

## सेवानिवृत्त सभासद, विशेष नैपुण्यप्राप्त सभासद व गुणवंत पाल्य यांचा

# गुणगौरव समारंभ

### टाऊन हॉल, उल्हासनगर-३, मंगळवार दि. २ ऑक्टोबर २०१८























## सेवानिवृत्त सभासद, विशेष नैपुण्यप्राप्त सभासद व गुणवंत पाल्य यांचा

# गुणगौरव समारंभ

टाऊन हॉल, उल्हासनगर-३, मंगळवार दि. २ ऑक्टोबर २०१८






















# सन २०१८-१९ वर्षात राबविलेल्या सभासद हिताच्या योजना व उपक्रम



























पुलवामा येथील हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबियांना
विद्यासेवक पतपेढीकडून आर्थिक मदतीचा हात.



विद्यासेवक ऋणमुक्ती योजनेचा लाभ व कर्ज संरक्षण योजनेचा
धनादेश देतांना सल्लागार माजी आमदार श्री. रामनाथ मोते सर.



स्व. वसंतराव बापटसरांच्या जयंती निमित्त कमलधाम वृध्दाश्रमातील
वृध्दांना फळं वाटप करतांना.




विद्यासेवक कन्यादान योजनेद्वारे सभासदाच्या कन्येला विवाह प्रित्यर्थ
रु. ५,५५५/- चा धनादेश देताना.




संचालक, अधिकारी, कर्मचारी सहकारी शिक्षण व प्रशिक्षणावेळी
प्रास्ताविक करतांना व्यवस्थापक.



पतपेढीतील सेवानिवृत्त सभासदांच्या ठेवी स्विकारण्यास परवानगी मिळणेबाबत व पतपेढ्यांना
शासनाचे पुरस्कार देण्याबाबतचे निवेदन स्विकारतांना सहकार राज्यमंत्री मा. श्री. गुलाबराव पाटील



गुणवंत सभासद पाल्यांचा गौरव करताना प्रमुख पाहुणे
मा. आमदार ॲड. निरंजन डावखरे साहेब.



पतपेढीचे संस्थापक कार्यवाह व सल्लागार आद. श्री. जयंतराव ओक सर
यांच्या ७७ व्या वर्षी वाढदिवसानिमित्त उभयतांचे अभिष्टचिंतन करताना.

प्रेषक
कार्यवाह,
**ठाणे जिल्हा विद्यासेवक सहकारी पतपेढी, लि., ठाणे-पालघर.**
मुख्य कार्यालय : सुंदरा प्लाझा, पहिला मजला, सनई मंगल कार्यालय,
बैल बाजार, कल्याण (प) - ४२१ ३०१.

प्रति,
श्री./श्रीमती ____________________
____________________
____________________

मुद्रक : बद्रीनाथ प्रिंटर्स, उल्हासनगर-३. प्रती : ८५००